आंतर जिल्हा बदलीने नेमणूक देणेबाबत.
(श्रीम. स्मिता रमेश डाके, परिचर, प्रा. आ. कें.
चकलंबा, ता. गेवराई जि. बीड)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-१/आस्था-४/११५/४३९/२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरीत नमुद केलेप्रमाणे

वाचा :-१. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील परिपत्रक क्रमांक जिपब-०७११/प्रक्र-११३/११/आस्था १४,दि.२९/०९/२०११

२. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील शुद्धीपत्रक क्रमांक न्यायप्र-०५१२/प्रक्र-११८/१२/ आस्था-१४,दि.१८/१०/२०१२

३. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा सेवाप्रवेशनियम १९६७ मधील नियम ६ (८)

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांचेकडील प्रस्ताव जा. क्र. साप्रवि/आस्था-४/आजिब/कावि/१३७/२०१९ दिनांक ०८/०२/२०१९

५. इकडील पत्र जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/११५/५६६/२०२५ दि १९/११/२०२५

६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जि. प. बीड यांचेकडील प्रस्ताव जा. क्र. साप्रवि/ आस्था-४/कावि/३०२९/२०२६ दिनांक ०२/०७/२०२६

महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश( नियम १९६७ मधील नियम ६ (८) च्या तरतुदीस अधीन राहून मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, मला संदर्भ क्र. ३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार खाली नमूद केलेल्या परिचर गट-ड मधील कर्मचाऱ्यांना त्यांच्या नावासमोर नमुद रकाना क्र. ६ मध्ये नमुद ठिकाणी परिचर गट-ड या पदावर एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन सामावुन घेण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | सध्याचे कार्यालय | निवडीचा प्रवर्ग | सामावून घेणेचा प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | श्रीम. स्मिता रमेश डाके | प्रा. आ. कें. चकलंबा, ता. गेवराई जि. बीड | खुला | खुला | प्रा. आ. केंद्र दहिगावने, ता. शेवगाव जि. अहिल्यानगर |

अटी व शर्ती:-

१. परिचर गट-ड कर्मचाऱ्याना त्यांच्या सुधारित वेतनस्तरामध्ये ते सध्या ज्या मुळ वेतनावर काम करीत आहेत त्याच मुळ वेतनावर त्यांची एकतर्फी आंतर जिल्हा बदलीने अहिल्यानगर जिल्हा परिषदेमध्ये परिचर गट-ड या पदावर नेमणुक करण्यात येत आहे.

२. आदेशातील नमुद परिचर यांना अहिल्यानगर जिल्हा परिषदेमध्ये परिचर गट-ड या पदावर रुजु झालेनंतर त्यांची परिचर या पदावरील सेवाजेष्ठता जिल्हा परिषद अहिल्यानगरमध्ये ज्या दिनांकास कामावर रुजु होतील त्या दिनांकापासुन ग्राह्य धरण्यात येईल.

३. सध्या कार्यरत असलेल्या जिल्हा परिषदेकडुन त्यांचेकडेस कोणत्याही प्रकारची थकबाकी वसुलीस अहिल्यानगर जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही.

४. आदेशातील नमुद परिचर यांना सध्याच्या कार्यरत जिल्हा परिषदेकडुन कार्यमुक्त झाल्यानंतर अहिल्यानगर जिल्हा परिषदेमध्ये रुजु होण्याकरीता वाटचाल कालावधी व प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

५. अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे आंतर जिल्हा बदलीबाबतच्या नियम व अटी त्यांचेवर बंधनकारक राहतील.

६. अहिल्यानगर जिल्ह्यात कोठेही बदलीस पात्र राहतील.

७. आंतर जिल्हा बदलीने हजर झालेनंतर संबंधित कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी/DCPS खाते व खात्यावरील रक्कम ६ महिन्याच्या आत जिल्हा परिषद अहिल्यानगरकडे वर्ग करण्याची जबाबदारी संबंधित कर्मचारी व कार्यमुक्त करणाऱ्या जिल्हा परिषदेची राहील. सदर बाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास जिल्हा परिषद अहिल्यानगर त्यास जबाबदार राहणार नाही.

८. जिल्हा परिषदेची नोकरी सोडण्याची झाल्यास एक महिना आगाऊ नोटिस द्यावी लागेल अथवा एक महिन्याचे वेतन जमा करावे लागेल.

९. नेमणुकीबाबत व सेवाशर्तीबाबत शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश त्यांना बंधनकारक राहतील.

१०. आदेशातील नमुद परिचर गट-ड मधील कर्मचाऱ्यांची अहिल्यानगर जिल्हा परिषदेमध्ये केलेली नेमणुक तात्पुरत्या स्वरुपाची असुन त्यांना कोणतेही कारण न देता सेवेतुन कमी करण्याचा हक्क राखुन ठेवला आहे.

उपरोक्त १ ते १० अटी व शर्तीनुसार श्रीम. स्मिता रमेश डाके, परिचर यांना अहिल्यानगर जिल्हा परिषदेमध्ये परिचर गट-ड या पदावर त्यांचे नावासमोर रकाना क्र. ६ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी आंतरजिल्हा बदलीने पदस्थापना देण्यात येत आहे. तरी श्रीम. डाके, परिचर यांना दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होणेकरिता संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यमुक्त करावे.

सदरचे आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणकीय संकेतांक क्र. 20260723040135 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 23-07-2026 22:17:45
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्रीम. स्मिता रमेश डाके, परिचर,
प्रा. आ. कें. चकलंबा, ता. गेवराई जि. बीड

प्रत - माहितीसाठी व योग्य त्या उचित कार्यवाहीसाठी

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद बीड/अहिल्यानगर
३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद बीड/अहिल्यानगर
४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती गेवराई, जि. बीड
५. वै० अ० प्रा० आ० केंद्र दहिगावने, ता० शेवगाव, जि. प. अहिल्यानगर

२/-सदर कर्मचारी रजु होताच रजु अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.